तातडीचे :-
क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/उच्चशिक्षण प्रो.यो/१३९/(१७)/२०१८ मुंबई, दि. ०१.०९.२०१८

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक दि.१९.०९.२०१६ आणि दि.०९/०२/२०१७ चे परिपत्रक.

विषय :- पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन योजना.

* * * * * *

संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने पोलीस कल्याण निधी नियमावली मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीअंतर्गत पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पर्यंत) तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून रु.२५,०००/- इतकी रक्कम (स्कॉलरशिप) देणेबाबत मंजूरी देण्यात आलेली आहे.

यासंदर्भात आता असा निर्णय घेण्यात आला आहे की, खालील नमूद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस रु.१,००,०००/- (एक लाख फक्त) इतकी रक्कम अनुदान/स्कॉलरशिप म्हणून देण्यात येईल.

१. भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT)

२. भारतातील कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय, (MBBS)

जेथे सामायिक प्रवेश परिक्षेव्दारे प्रथम प्रवेश घेतला आहे.

सदर रु.१,००,०००/- (एक लाख फक्त) अनुदानापैकी रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम धनादेशाव्दारे अदा करावी व उर्वरित रक्कम रु.७५,००००/- (पंच्याहत्तर हजार रुपये) इतक्या रक्कमेची एका वर्षाची मुदत ठेव (FDR) प्रमाणपत्र तयार करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावे. तसेच सदरची योजना ही सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून लागू होईल.

या प्रकरणी असे स्पष्ट करण्यात येते की, दि.१९/०९/२०१६ चे परिपत्रकामधील खालील नमूद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस यापूर्वीच्याच तरतुदीप्रमाणे एकावेळी रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम अनुदान/स्कॉलरशिप म्हणून देय राहील.

१. भारतीय प्रबंध संस्था (IIM)

२. सर्व नॅशनल लॉ स्कूल्स

३. सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था (NIT)

४. भारतातील कोणतेही डेंटल (BDS) महाविद्यालय,

जेथे सामायिक प्रवेश परिक्षेव्दारे प्रथम प्रवेश घेतला आहे.

याबाबत असे निदर्शनास आले आहे की, या कार्यालयातील परिपत्रकात नमुद अटींनुसार/तरतुदीनुसार अनुदान/स्कॉलरशिप तसेच अग्रिम/ कर्ज वाटपाची कार्यवाही योग्य प्रकारे होत नाही. त्यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार शैक्षणिक अर्हतेची पडताळणी न करता अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकातील अटींचे काटेकोरपणे पालन करावे.

Desktop/Memo/2017

Scanned by CamScanner

ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच सभासद असलेल्या मंत्रालयीन कर्मचा-यांना अनुदानाची / स्कॉलरशिप ची रक्कम अदा करण्यात येईल, त्याबाबतच्या आवश्यक त्या नोंदी दोन स्वतंत्र रजिस्टरमध्ये संबंधीत पोलीस कल्याण निधीचे कामकाज पाहणा-या लिपीक / प्रमुख लिपीकांनी न चुकता घेवून ते पोलीस उपायुक्त / पोलीस उपअधीक्षक ( मुख्यालय ) यांनी प्रमाणित कराव्यात.

1/1/18

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / विशेष कृती / द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई / न.वि.अ.,नागपूर / फोर्स वन,मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड सह
उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.
पोमसं कार्यालयातील विधी सल्लागार /विधी अधिकारी/वउपसहा.(नि.वे.)/आस्थापना-१
पोमसं कार्यालयातील स्वीय सहायक / लघुलेखक.
पोमसं कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी (का.क्र.१ ते ४४)
(त्यांनी उपरोक्त परिपत्रक सर्व लिपिकांच्या निदर्शनास आणून द्यावे.)

प्रत,

पोलीस आयुक्त बृहन्मंबई (सस्नेह)
प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा.यांचे कार्यालय, मुंबई.

२/- प्रभारी अधिका-यांनी सोबत जोडलेले परिपत्रक पोलीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

Desktop/Memo/2017

Scanned by CamScanner